# कराडच्या 'श्रीमती रुक्मिणीबाई पी.कदम कन्या विद्यालयात ६०० विद्यार्थिनींना लाभले सायबर योद्ध्यांचे मार्गदर्शन

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.१७**

आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटच्या वाढत्या वापरासोबतच सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वेगाने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थिनींमध्ये डिजिटल सुरक्षेविषयी जागृती निर्माण करण्यासाठी कराड येथील श्रीमती रुक्मिणीबाई पी. कदम कन्या विद्यालयात विशेष 'सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळेचे' यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला विद्यालयातील सुमारे ५०० ते ६०० विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



सायबर धोके आणि बचावाचे तंत्रशुद्ध धडे कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आणि सायबर योद्धा अथर्व घोरपडे व विनायक शिंगारे यांनी विद्यार्थिनींशी थेट संवाद साधत दैनंदिन जीवनात समोर येणाऱ्या सायबर आव्हानांची सविस्तर उकल केली. सध्याच्या काळात मोठ्या प्रमाणावर घडणारे बनावट कॉल्स , संशयास्पद लिंक्स, सोशल मीडिया हॅकिंग, गुगल पे व फोनपे फ्रॉड, तसेच बनावट बँक मेसेज आणि ओटीपी फ्रॉड यांसारख्या आर्थिक व डिजिटल फसवणुकीच्या क्लृप्त्या त्यांनी वास्तववादी उदाहरणांसह स्पष्ट केल्या.

या सायबर धोक्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी आपला ओटीपी , यूपीआय पिन , एटीएम पिन , पासवर्ड किंवा बँकखात्याशी संबंधित कोणतीही वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्तीशी कधीही शेअर करू नये, असा स्पष्ट इशारा वक्त्यांनी दिला. तसेच, कोणत्याही अनधिकृत लिंकवर क्लिक न करणे आणि ऑनलाइन व्यवहार करताना पूर्ण खात्री करूनच पाऊल उचलणे, अशा महत्त्वाच्या खबरदारीच्या उपायांवर त्यांनी विशेष भर दिला. 'डिजिटल सुरक्षा ही आजच्या काळाची गरज आणि प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे,' असा मोलाचा संदेश या प्रसंगी देण्यात आला.

दुर्दैवाने सायबर फसवणूक झाल्यास अथवा संशय आल्यास घाबरून न जाता किंवा विलंब न करता तात्काळ संबंधित बँकेशी संपर्क साधावा. तसेच, भारत सरकारच्या राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन क्रमांक '१९३०' (१९३०) वर त्वरित तक्रार नोंदवून मदत मिळवावी, असे आवाहन सायबर योद्ध्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुनिता पाटील यांनी या जनजागृती उपक्रमाचे मन:पूर्वक कौतुक केले. आजच्या डिजिटल युगात विद्यार्थिनींनी इंटरनेट व सोशल मीडियाचा वापर अत्यंत सजगतेने आणि जबाबदारीने करणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी मार्गदर्शन करणाऱ्या सायबर योद्ध्यांचे आभार मानले.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथील सायबर शक्ती क्लबच्या वतीने कराड परिसरातील शाळा व महाविद्यालयांमध्ये सायबर जनजागृती कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये तसेच नागरिकांमध्ये वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि सुरक्षित डिजिटल व्यवहारांच्या सवयी रुजविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव वाघ आणि सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रमाच्या समन्वयक डॉ. प्रियांका शिंदे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. क्विक हील फाउंडेशनच्या सौ. अनुपमा काटकर, अजय शिर्के, दिपू सिंग आणि सौ.गायत्री केसकर यांचे या उपक्रमासाठी सहकार्य लाभत आहे.